# प्रकरण पाचवे

## उपसंहार

## उपसंहार

ज्ञानेश्वरीतील निसर्गप्रतिमा या विषयावर संशोधन करता करता आपण काही महत्त्वाचे टप्पे घेत आलो. "निसर्गप्रतिमा" असे म्हटल्याने प्रथम प्रतिमेची संकल्पना व स्वरूप स्पष्ट करणे प्राप्त झाले. तद्नंतर आला निसर्ग. याच्याकडे "भोवतालचा आसमंत" या ढोबळ दृष्टीने आपण पहात असतो. पण या निसर्गाला स्वत:चे असे स्वतंत्र अस्तित्व असते. त्यालाही एक व्यक्तिमत्व असते याची आपणांस जाणीव नसते. या निसर्ग स्वरुपाचे, त्याच्या व मानवाच्या सहसंबंधाचे विवेचन आपण दुस-या प्रकरणात केले. त्यानंतर तिसरा टप्पा घेतला तो ज्ञानेशांच्या कर्तृत्व व व्यक्तिमत्त्वाचा. त्यांच्या कवित्वादी पैलूवर चर्चा करून आपण चौथ्या प्रकरणात निसर्गप्रतिमांचा सविस्तर आढावा घेतला.

या सा-या प्रकरणप्रपंचातून जे काही निष्कर्ष आपणांस मिळाले त्यांचा संकलनात्मक एकच विचार येथे करणार आहोत.

पहिल्याच प्रकरणात प्रतिमेबद्दल मांडलेल्या विचारातून एक गोष्ट स्पष्ट होते. ती म्हणजे प्रतिमेच्याबद्दल कोणती एक निश्चित संकल्पना अद्याप मांडली गेलेली नाही. त्यामुळे प्रतिमेसंदर्भात ब-याच संदिग्ध कल्पना मराठीत वावरताना दिसतात. त्यात दुसरी गोष्ट म्हणजे प्रतिमेचा जास्तीत जास्त विचार पाश्चात्यांनी केलेला दिसतो व त्याच सामुग्रीवर आपण प्रतिमेचा अभ्यास आजपर्यंत करीत आहोत. प्रतिमा स्वरुपावर जी चर्चा झाली तिला पाश्चात्य विचारांचाच आधार घेतला गेलेला दिसतो.

प्रतिमेच्या सर्व व्याख्यांचा विचार करता त्यातील कोणतीच व्याख्या सर्वांगपरिपूर्ण आहे असे दिसत नाही. "सात आंधळे व हत्ती"च्या गोष्टीप्रमाणे प्रत्येकजण एकच परिकल्पना घेऊन त्यालाच संपूर्ण प्रतिमा समजून अक्करमाशीसारखा घुटमळत राहिलेला दिसतो. कुणी प्रतिमा म्हणजे " Image " म्हणते तर कुणी तिला "प्रतिबिंब" वा "नक्कल" ठरविते. कुणी तिला "प्रतिनिधीच्या" रुपात

पहाते तर कुणी "प्रतिमाच्छाया" म्हणून संबोधते. कुणी तिच्यात रूपकाचा अंतर्भाव करते तर कुणी उपमा, प्रतिमानांचा त्यात समावेश करते. एकंदरीत , प्रतिमाच्छाया, अनुभवचित्र, उपमान, प्रतिमान या सा-याच शब्दांनी प्रतिमा ओळखली जाते. रुपक व कल्पनाचित्राचाही यात समावेश केला जावा असा आग्रह धरला गेला यावरून "प्रतिमा" शब्दाची व्याप्ती केवढी मोठी आहे हे लक्षात येते. डॉ. देशमुख, डॉ. काळे, आपटे, मर्ढेकर, वाळिंबे या सा-यांनीच केलेल्या प्रतिमेच्या व्याख्यांचे एकांगीपण आपणांस जाणवल्याशिवाय रहात नाही.

अलंकार म्हणजे प्रतिमा असेही मत मांडले जाते. ही प्रतिमा कधी दृश्य असते तर कधी एखाद्या संवेदनेची अनुकृती म्हणून येते. कधी विचार म्हणून तर कधी दोन वस्तुतील तुलनात्मक एकात्मता म्हणून येते. संस्कृत व मराठी कवींनी प्रतिमा निर्मितीचे साधन म्हणून अलंकारांचाच विचार केलेला दिसतो. प्रतिमेचा मानस-शास्त्रीय व साहित्यशास्त्रीय असा दुहेरी पातळीवरून विचार केला गेलेला दिसतो. इझरा पाउंड, लेविस, सुधीर रसाळ या पाश्चात्यपौर्वात्य, जुन्या नव्या व्याख्यांच्या विचारानंतर शेवटी आपण यातून एकच अशी सर्वसमावेशक व्याख्या करण्याच्या निष्कर्षाप्रत येतो की जिच्यात या सर्व मतांचा सुयोग्य समन्वय व समतोल साधला असेल व जी सर्वांगपरिपूर्ण असेल अशी व्याख्या पुढीलप्रमाणे सांगितली आहे.

"संवेदना, रूपकात्मकता, उत्कट भावना व वैशिष्टयपूर्ण काव्यात्मक वासना यांनी ओथंबलेले आणि कवीची अनुभुति वाचकांत संक्रमित करीत असतांना संदर्भगत सापेक्षता व परस्परावलंबन यातून निर्माण होणा-या काव्यात्मक सत्याद्वारे रसिकांच्या चित्तवृत्ती आनंदित करणारे शब्दचित्र म्हणजे प्रतिमा होय".

<u>प्रतिमेचे प्रकार</u> - प्रतिमेच्या स्वरुपांवरून साधी व संयुक्त, अचल व गतिमान असे प्रतिमेचे भेद मानले गेलेले दिसतात.

<u>प्रतिमेचे काव्यगत महत्त्व</u> - प्रतिमेचे काव्यातील महत्व अनन्यसाधारण आहे. अर्थात इतर म्हणतात म्हणून आपण असे मानावे कां ? हाही प्रश्न येतोच. पण काव्या-

तील प्रतिमेची आवश्यकता आपल्या संशोधक नजरेने न्याहाळली तर प्रतिमेची अपरिहार्यता जाणवल्याशिवाय रहात नाही. किंबहुना काव्याचे प्रमुख उपकरण म्हणून पंचविषयात्मक सूक्ष्म प्रतिमासृष्टीकडे पहावे लागते. शिवाय काव्याचे व्यवच्छेदक लक्षण म्हणून तिचे महत्त्व पटते ते अलाहिदा. प्रतिमा म्हणजे काव्याचा श्वासोच्छवास एवढे म्हटले तरी तिचे अटळपण समजते. कवी नेहमी प्रतिमेच्या भाषेतच बोलत असतो. इतर साहित्य प्रकारांपेक्षा काव्यात प्रतिमेला पुरता वाव असतो. यातून प्रतिमेचे काव्याशी असलेले अविभाज्यत्व दिसून येते. येथे सर्व विचारांती प्रतिमा हे काव्याचे अंगभूत, स्वयंभ व स्वयंनिर्मित आत्मकत्व आहे हे आपणांस मान्य करावेच लागते. तरीही प्रतिमा हे काव्यसौंदर्याचे एक साधन आहे. साध्य नव्हे हे विसरुन चालत नाही.

<u>कवी व प्रतिमा संबंध</u> - पहिल्या प्रकरणात केलेल्या सविस्तर चर्चेतून कवी व प्रतिमेचे अतूट नाते सिध्द होतेच. कल्पनाशक्ती [ Imagination ] नामक मानस प्रक्रियेने कवी नवी प्रतिमासृष्टी निर्माण करत असतो व या प्रतिमासृष्टीच्या वैविध्यावरच काव्याचे श्रेष्ठत्व ठरत असते. म्हणजेच ही प्रतिमा म्हणजे कल्पनेचे साकार शब्दरुप असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. कधी उस्फूर्त तर कधी सहेतुक असे प्रतिमा निर्मितीचे स्वरुप असते.

कवी व प्रतिमेचे नाते हृदय व स्पंदनासारखे असते. दोघेही परस्परावाचून अस्तित्व टिकवू शकत नाहीत. किंबहुना प्रत्येक प्रतिमेला कवीच्या व्यक्तित्वाची पार्श्वभूमी व भावनांचा संदर्भ लाभल्यानेच ती अर्थपूर्ण ठरत असते. कवी प्रतिमेला अर्थपूर्णत्व व आशय घनता देत असतो. तर प्रतिमा कवीला श्रेष्ठत्व देत असते.

<u>प्रतिमा प्रक्रिया</u> - प्रतिमा अकस्मित निर्माण होत नाही तर ती विशिष्ठ प्रक्रियेतून निर्माण होत असते. याच्या विविध प्रक्रियांचा सविस्तर विचार आपण यापूर्वी केला आहेच.

हेतूपूर्वक, उस्फूर्त, भक्तीनिर्मित, कृत्रिम कारागिरीतून, प्रतिमाशृंखला,

अर्धचेतनावस्थेत, काव्यतंद्रीत, ज्ञानाच्या हेतूने, कल्पनानिर्मित अशा विविध प्रक्रिया येथे अभ्यासल्या आहेत. यातून एक गोष्ट जाणवते ती म्हणजे या सर्वात काव्यतंद्रीत असताना आलेल्या प्रतिमा सर्वश्रेष्ठ, स्वयंपूर्ण व संक्रमिततायुक्त असतात. त्यामुळे त्याच महत्वाच्या ठरतात.

प्रतिमेचे निकष - चांगली वाईट प्रतिमा ठरवण्यासाठी काही निकषही आले आहेत. या निकषांवर घासून त्या कसास उतरणाऱ्या प्रतिमाच श्रेष्ठ ठरतात.

काव्य विषयाशी अनुरुपता, संस्काराची सुसंगती, भावनिक औचित्य, व परिणामकारकता, आत्मनिष्ठ अभिरुची, ताजेपणा, भावनास्पर्शित्व [तीव्रता], आकर्षकता, आशयनुरुपता, प्रमाणबध्दता या निकषांवर प्रतिमेचे श्रेष्ठत्व अवलंबून असते.

प्रतिमांचे वर्गीकरण - विविध पातळीवरुन प्रतिमांचे बरेच प्रकार सांगितले गेले आहेत. बध्द प्रतिमा, मुक्त प्रतिमा, अलंकरणप्रधान प्रतिमा, भावनात्मक, ओजप्रधान, वस्तुप्रधान, घनात्मक, विस्तारप्रधान, नादमय प्रतिमा असे प्रतिमांचे वर्गीकरण केले आहे. यात रुपक कथा, पुराणकथा, दृष्टांतकथा, नीतीकथा, अन्योक्ती कथा यांचाही समावेश केला जातो.

अलंकारिक, वक्तृत्वपर्ण, असंघटित पतिमा असेही वर्गीकरण केले जाते. तथापि या सर्व प्रतिमा कवितेची अविभाज्य अंगे आहेत हे विसरता येत नाही.

प्रतिमा म्हणजे उपमान की उपमेय ? अशी शंका उपस्थित केली जाते. तसेच उपमा व रुपकांचाही या प्रतिमेतच अंतर्भाव होतो. हे मिडल्टन मरीचे मत रास्त आहे.

या सर्वांबरोबरच आजचे प्रतिमेचे बदलते स्वरुप दुर्लक्षून चालणार नाही. आपण या बदलत्या स्वरुपाची दखल घेतली पाहिजे.

दुसऱ्या प्रकरणात आपण निसर्ग व मानवी संबंधांवर सविस्तर विचार केला आहे. मानवी मनातील निसर्गाची अनिवार ओढ व आकर्षण, त्याच्या

मनातील या सृष्टीबद्दलचे प्रेम, आपुलकी आपण पाहिले. दैनंदिन व्यवहाराच्या धकाधकीतन कुठेतरी निवांतपणा शोधण्यासाठी मनुष्याला निसर्गाच्या सान्निध्याची गरज असते. निसर्गही त्याच्या श्रमांचे परिहारण करण्यासाठी आतुर असतो. आजच्या शहरीकरणामुळे मनुष्य निसर्गापासून काहीसा दुरावला आहे. तरी त्याच्या मनातील सुप्त ओढ अद्याप कायम आहे. मानवी मनातील ही ओढ पुरातन काळापासून दिसते. प्राचीन ऋषीमुनींनी तर या निसर्गलाच आपल्या तपश्चर्येचा साक्षीदार मानले. संसारी माणसापासून विरक्त संन्याशांपर्यंत सर्वांच्याच मनात याचे आकर्षण सतत जाणवते.

निसर्ग प्रेमाला प्रवृत्ती-निवृत्तीप्रमाणे स्थलकालाचेही बंधन नसते. देशांच्या, जातींच्या, धर्मांच्या सीमा निसर्गप्रेमाच्या आड येत नाहीत. मात्र ही निसर्गप्रीती ओढून ताणून न आणता जन्मतःच निर्माण व्हावी लागते.

मनुष्य व निसर्ग यांच्यातील नात्यांचे विविध स्तर व त्यांचे स्वरुप-देखील आपण अभ्यासले. साहचर्य संबंध, दृष्टा-दृश्य संबंध, माता-बालक संबंध, भोक्ता-भोज्य संबंध, उद्दीपक-उद्दीप्य संबंध, शिक्षक-विद्यार्थी संबंध, प्रेरक-प्रेरीत संबंध अशा विविध पातळ्यांवरुन निसर्ग व मानवाचा प्रतीत होणारा संबंध आपण पाहिला.

निसर्ग व मानवी भावभावना यांच्यातील असणारे अतूट साहचर्य आपण स्पष्ट केले. मानवी भावनाना उत्तेजित करुन त्यांचा परिपाक एखाद्या कलाकृतीत करण्याचे कार्य हा निसर्ग मोठ्या उत्साहाने करत असतो. भावना उद्दिपित करुन त्यांच्या उत्कट परिपोषाद्वारे त्यांना साकृती देण्याचेही कार्य निसर्गच करतो. भय, क्रोध, आश्चर्य इ. भावनांचा परिपोष निसर्गाच्या सहवासात झाल्याचे सिध्द झाले आहे. मानवाचा मानसिक व भावनिक विकास करण्याचे कार्य निसर्ग करीत असतो.

साहित्य-साहित्यिक-निसर्ग यांचा परस्परसंबंध - कोणत्याही साहित्यात निसर्गाचे चित्रण अपरिहार्य असते. कधी वर्णन, कधी पार्श्वभूमी, कधी सहाय्यक, तर कधी

व्यक्तिरेखा म्हणून हा निसर्ग साहित्यात येतच असतो. संतकवींनी देखील आपल्या काव्यात निसर्गाचा उपयोग हेतूपूर्वक करून घेतलेला दिसतो. कालिदास, भवभूती इ. प्रभृतींची काव्ये म्हणजे निसर्गाची रम्य नि:श्वसितेच आहेत. साहित्यिक निसर्गाच्या सौंदर्याने प्रभावित होऊन त्यालाच आपल्या लेखनाची प्रेरणा बनवितो.

सामान्य माणसे व साहित्यिक यांचा निसर्गाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात महद अंतर असते. निसर्ग आपल्या सौंदर्याचे भांडार उघडून बसलेला असतो. सामान्य माणसाला हे सारे दिसते. त्याचा आस्वादही तो लुटतो. परंतु साहित्यिकाची काव्यात्म दृष्टी, संवेदनक्षमता, तरल कल्पनाशक्ती, सूक्ष्म निरीक्षणशक्ती सामान्य माणसात नसते.

शास्त्रज्ञ, तत्वज्ञ व साहित्यिक यांच्याही निसर्ग विषयक दृष्टीकोनात असाच फरक असतो. तत्वज्ञ व शास्त्रज्ञ बुध्दी व तर्काच्या सहाय्याने तत्व संशोधन करतात तर साहित्यिक कल्पना व भावनेच्या आधारे सौंदर्यचित्रण करतात. शास्त्रज्ञ नवे तत्व शोधतो तर साहित्यिक कल्पकतेच्या आधारे नवी कलाकृती प्रसवतो. एक बौध्दिक तर दुसरी सृजनात्मक प्रक्रिया असते.

<u>निसर्ग व कवी यांच्यातील नाते</u> वेगळ्याच पातळीवरचे असते. कवी संवेदनशील मनाचा असतो. निसर्ग हा त्याच्या काव्यातील प्रमुख प्रेरणा असतो. क्षणात नाहीसे होणारे दिव्य भास त्याला निसर्गाच्या सान्निध्यातच सापडत असतात. प्रतिभेच्या दिव्य रुपाचा साक्षात्कारही त्याला येथेच घडत असतो. कवी व निसर्गाचे हे सहसंबंध, सान्निध्य शब्दांच्या पलीकडले असतात.

मात्र या निसर्गचित्रणालाही काही मर्यादा पडतात. कित्येकदा त्याच त्याच गोष्टींची पुनरावृत्ती, तोच तोच पणा, कवी प्रतिभेचे तोकडेपण या दोषांमुळे या मर्यादा पडतात.

निसर्गचित्रणाचे विविध प्रकार साहित्यात आले आहेत. व्यक्ती तितक्या प्रकृती या नात्याने निसर्गाचे चित्रण विविध प्रकारांनी केले जाते. साध्यरूप निसर्ग-

चित्रण/ आलंबनरूप [स्वाभाविक, चेतनकृत], उपदेशरूप निसर्गचित्रण, साधनरूप निसर्गचित्रण [उद्दीपन, विभाव, वातावरण, अलंकरणरूप चित्रण] हे निसर्गचित्रणाचे विविध प्रकार आहेत.

निसर्गाला धार्मिक व तात्त्विकही अधिष्ठान आहे. ज्ञानेश्वरांचा चिद्विलासवाद, शंकराचार्यांचा मायावाद, आर्यांच्या देवदेवता, वेद यांना निसर्गाचीच बैठक लाभलेली दिसते.

तिस-या प्रकरणात आपण ज्ञानेश्वरांच्या कार्यकर्तृत्वाचा व व्यक्तित्वाचा आढावा घेतला. अज्ञानी लोकांना अध्यात्म ज्ञानाचा लाभ करुन देण्याच्या उदात्त हेतूने ज्ञानेशांनी जे लेखनकार्य केले ते अत्यंत महत्वाचे आहे. त्यांच्या ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी व अभंगवाणी या ग्रंथरत्नाद्वारे त्यांनी मराठी साहित्यात ब्रम्हरसाचा सुकाळच करुन ठेवला.

" मां हि पार्थ बपाश्रित्य ये पि स्युः पापयोनयः ।
स्त्रियोवैश्यास्तथा शूद्रोस्ते पि यांति परांगतिम् ।। [गीता अ. ९-३२]
या उदात्त हेतुने त्यांनी आपली लेखणी राबविली.

<u>ज्ञानेश्वरांची भूमिका</u> कठोर तत्वज्ञाची नव्हती तर अनुभूतीतील उत्कटतेचा ध्यास असलेल्या संवेदनशील, प्रतिभाशाली, अत्यंत हळुवार वृत्तीच्या कवीची होती. म्हणूनच भक्तितत्त्वाचे, शास्त्रसिध्दांताचे विवेचन प्रतिमा, उपमा व रुपकाच्या सहाय्याने ते करतात. मराठीचे सामर्थ्य त्यांना सिध्द करुन दाखवण्याचे होतेच. शिवाय शब्दांचे सामर्थ्य, व्यापकपणा, नादमाधुर्य, शैलीची रसाळता या गोष्टी मराठीद्वारे अविष्कृत करावयाच्या होत्या. अध्यात्मविद्येचे तर्कशुध्द प्रतिपादन करण्यापेक्षा रसप्रकर्ष व विविध काव्यसौंदर्य निर्माण करण्याची लालसाच त्यांना अधिक होती असे दिसते. शब्दसौंदर्य व शब्दांचे नागरपण दाखवून, "ओविया होती लेणे साहित्यासी" हे त्यांना दाखवावयाचे होते. शब्दातीत अध्यात्मज्ञान भाषेच्या रमणीयतेतून त्यांना द्यायचे होते. मराठी भाषेच्या देशात "साहित्य सोनियाच्या खाणी" त्यांना निर्माण करायच्या होत्या.

"तैसा प्रबंधु हा श्रवणीं । लागतखेंचो समाधी आणी ।।" [ज्ञा.अ. १८-१७४४] अशी सुंदर शब्दांची, कल्पनाचित्रांची पखरण त्यांना करावयाची होती. आपले वक्तृत्त्व म्हणजे श्रोत्यांना दिवाळसण, रसरसलेली वसंतशोभा, पौर्णिमेच्या शेकडो चंद्रांची शोभा करण्याचा ते प्रयत्न करतात. त्यामुळे तत्वज्ञाच्या भूमिकेपेक्षा त्यांच्यातील कवीची भूमिका अधिक प्रभावी ठरलेली दिसते. रसाळ भाषा, सुंदर कल्पनाचित्रे, चुकीबद्दल वाचकांची क्षमा मागण्याची हळवी नम्रता, कवित्वाबद्दल आत्मविश्वास यातून त्यांची रसिक कविचीच भूमिका अधिक स्पष्ट होते. त्यांना [नवनिर्मिती] करावयाची होती. त्यांच्या उपमा, रूपकांची पखरण, असंख्य कल्पनाचित्रे पाहिल्यास हा प्रतिभावान कवी आहे याचीच खात्री अधिक पटते.

ज्ञानेश्वरांच्यावरील पूर्वसंस्कारांचादेखील आपण विचार केला. वेद-वाङ्मय, संस्कृत काव्यनाटके, पुराणे, श्रुतीस्मृती, षड्दर्शने, वेदांत, मिमांसा, गीता-संबोधिनी नामक ग्रंथ, गीताभागवत, अरण्यके, आयुर्वेद आणि साहित्यशास्त्र या सर्वांच्या त्यांच्यावर संस्कार झालेला दिसतो. काव्याच्या बाबतीत अभिनव-गुप्ताचा संस्कार प्रामुख्याने जाणवतो.

ज्ञानेशांच्या दुहेरी व्यक्तिमत्वाचा विचार करुन तत्वज्ञानी ज्ञानेश्वर व कवी ज्ञानेश्वर या उभयरुपांच्या चर्चेनंतर प्रभावी ठरलेले कवी ज्ञानेश्वरच आपणांस भावतात हे ही आपण सिध्द केले. "तैसे देशियेचें लावण्य । हिरोनि रसां आणिलें तारुण्य ।" [ज्ञा.अ. १०-४७] यातून त्यांच्या कवित्वाच्या भूमिकेचाच स्पष्ट उल्लेख दिसतो. त्यांना "जान विषो", "ज्ञानाचे बोलणे" करुन "बोली अरुपाचे रुप" दाखवावयाचे होते. "शब्दातीत स्वभावे" अशा तत्त्वाचे आकलन घडवावयाचे होते. पण ते करतांना त्यांना व्यंजनेच्या विविध घटांची उपेक्षा करुन व सौंदर्यतत्वे धुडकावून नव्हे. मात्र रसाळ शब्दांची पखरण करुन तात्त्वीक प्रतिपादनाची त्यांना उपेक्षाही करायची नव्हती. नादमाधुर्याला अंतर्गत आशयाची जोड देवून नागर-रचनेतून साहित्याचा कलात्मक प्रकर्ष [ Artistic Perfection ] साधावयाचा होता.

ज्ञानेशांचा समन्वयवादी दृष्टीकोनही येथे जाणवला. त्यानंतर ज्ञानेश्वर व इतर कवी यांच्यातील फरक लक्षात घेवून ज्ञानेशाच्या निसर्गाचे भिन्नत्व स्पष्ट केले. त्यांच्या चौफेर दृष्टीचा प्रत्यय येथेच आपणांस आला.

चौथ्या व मुख्य प्रकरणात आपण ज्ञानेश्वरीतील निसर्गप्रतिमांचा विषय व अधिक्यानुसार वर्गवारी करून व त्यामागील अध्यात्मिक संदर्भासहित विचार केला. यातून काही ठळक निष्कर्ष आपणांस मिळाले. ज्ञानेशांना असणारी तेजाची अनिवार आसक्ती, निसर्गातील प्रत्येक घटकांबद्दल असणारी आपुलकी, रंगीसुरंगतेची असणारी उत्कृष्ट जाण, चराचरातील सूक्ष्म कृमीकिटकांच्याबद्दलचाही आत्मभाव निसर्गाच्या भव्यदिव्यतेबद्दल असणारे अनामिक आकर्षण या सर्वच गोष्टी येथे प्रकर्षाने जाणवतात.

त्यांच्या लेखनात सूर्य, चंद्र, तारे, नद्या, समुद्र, डोंगर, द-या, वृक्ष, वेली, पशु, पक्षी या सर्वांचाच होणारा समावेश पाहिला की त्यांच्या दृष्टीच्या व्यापकतेची जाणीव होते. ज्ञानेश्वरी हे नाटक नसल्याने यातील प्रतिमांच्या बाबतीत मात्र वेगळीच अडचण निर्माण होते. नाटकातील प्रतिमा विशिष्ठ नाटयपूर्ण घटनेतून व व्यक्तिस्वभावातून निर्माण झालेल्या असतात. त्रुटित- प्रतिमांचा आशय तेवढ्यापुरताच मर्यादित असतो. ज्ञानेश्वरीतील प्रतिमांच्या बाबतीत हेच म्हणावे लागते. कोणत्या विशिष्ठ उपमेयासाठी ज्ञानेश्वर कोणते उपमान वापरतात ? कोणत्या विशिष्ठ उपमेयासाठी विशिष्ठ उपमानेच वापरतात की सोयीनुसार हवी ती वापरतात ? काही विशिष्ठ प्रतिमाच ज्ञानेश्वरांना विशेष प्रीय आहेत काय ? त्यांना विशेष प्रीय वाटणा-या उपमा, प्रतिना कोणत्या ? हे सारेच प्रश्न येथे उपस्थित होतात. या सा-यांची उत्तरे आपणांस निसर्गप्रतिमांच्या विवेचनात आपोआपच सापडत जातात. प्रतिमेला संदर्भाशिवाय अर्थ नसतो. ज्या संदर्भात एखादी प्रतिमा वापरली असेल त्या संदर्भाचा विचार करून विचाराच्या ओघाशी त्या प्रतिमेचा नेमका संबंध शोधून काढणे महत्त्वाचे असते. तरच प्रतिमेचे खरे मर्म समजते. म्हणूनच आपण प्रतिमेबरोबर त्यामागील अध्यात्मिक संदर्भाचाही विचार

केलेला आहे. येथे एक स्पष्ट होते की तात्त्वीक विवेचन स्पष्ट करण्यासाठी ज्ञानेश्वरांनी मुख्यत: विविध प्रतिमांचा उपयोग केलेला दिसतो. काही [Descriptive Simile ] वर्णनात्मक उपमा विषय स्पष्टीकरणासाठी न येता दृश्याच्या वर्णनासाठी देखील आल्या आहेत. यासाठी सहाव्या अध्यायातील कुंडलिनीच्या स्वरुपाचे वर्णन, योगी पुरुषाच्या शरीराचे वर्णन, वृध्दापकाळाचे वर्णन [आ. अ. १३-५५८ ते ५७०] ही उदाहरणे पाहण्यासारखी आहेत.

ज्ञानेश्वरांच्या प्रतिमा प्रामुख्याने उपमा व रुपकाद्वारेच प्रकट होतात. कोणताही विचार उपमारुपकांच्या अवगुंठनातूनच येथे प्रकटतो. या प्रतिमा उप-या म्हणून येत नाहीत. तर विवेचनाच्या गाभ्यात त्या पुरत्या मुरुन गेलेल्या दिसतात. एक उपमा केंव्हा संपली व दुसरी केंव्हा सुरु झाली हे समजणे कठिण होण्याइतपत उपमा, रुपक व प्रतिमांची सरमिसळ झालेली दिसते. विवेचनातून ती बाजूला काढता येत नाही. काही ठिकाणी उपमेय व उपमानांची विचित्र गल्लत सोडल्यास ज्ञानेश्वरीत प्रतिमांच्या सरीवर सरी कोसळताना दिसतात.

कित्येकदा या प्रतिमांच्यात रुपकाचा भाग दिसतो. रसिकांच्या वृत्ती उल्हसित करण्यासाठी, दोन वस्तूतील साम्यप्रत्यंतर देण्यासाठी रुपकांचा वापर केलेला दिसतो. "ही रुपके म्हणजे रसिकांच्या दृष्टीने काव्यात्म सौंदर्याचा एक साक्षात्कारच असतो" असे मिडल्टन मरी म्हणतो.[१] शास्त्रीय विवेचनाचा तार्किक काटेकोरपणा सुरु होण्यापूर्वी रुपकाचा जन्म झाला व ज्ञानाचे पहिले अविष्करण ज्या रुपकाच्याद्वारे झाले. अशा रुपकांचा भाषा व विचारांच्या काटेकोरपणासाठी कविला उपयोग होतो. ज्ञानेश्वरांसारख्या अलौकिक कल्पनाशक्तीच्या कविचे एक पाऊलही रुपकाशिवाय उचलत नाही. अश्वत्थाचे रुपक, चित्सूर्याचे रुपक, माया नदीचे रुपक या दृष्टीने पाहण्याजोगे आहे.

---

१. मिडल्टन मरी-"The Poetic Image" पान २३.

या सा-या विवेचनातून आपणांस काही महत्वाच्या गोष्टी प्रतित झाल्या त्या म्हणजे -

१] अमृताच्या शीतलतेला व माधुर्याला लाजवेल असे रसाळ शब्द वापरून मोहक नागरपदबंधाची गुंफण करून, कवित्वाचे अलौकिक दिव्य सौंदर्य मूर्त करून, कल्पना विलासाची भरारी दाखवून आपले कवित्व श्रोत्यांसमोर प्रकट करण्याची ज्ञानेशांची प्रतिज्ञा साध्य झालेली दिसते.

२] साधुपुरुषाच्या हृदयातला "कारुण्यामाजि पाउले लपवून" चालण्याचा हळुवार-पणा ज्ञानेशांच्या हृदयी दिसतो. या हळुवारपणातूनच कोमल भावनांनी मोहरलेली कल्पनाचित्रे ते रेखाटतात.

३] संवेदनांची अनिवार आसक्ती त्यांच्या ठिकाणी प्रकर्षाने जाणवते, याच लालसेतून कोंभांची लवलव रसिकांच्या समोर ते प्रकट करुन दाखवितात.

४] कल्पनाविलासाच्या हव्यासातून मनोज्ञ कल्पनाचित्रेही ते साकार करतात.

५] संवेदनांच्या एकसमयावच्छेदेकरुन निर्मिती इच्छेतून अनेक सुंदर शब्दचित्रे ते निर्माण करतात.

६] एखादयाच शब्दाने भावनाजागृती वा संवेदननिर्मिती करण्याचे कौशल्य त्याना साधले आहे.

७] असंख्य आकर्षक पदबंध निर्माण करुन, शैलीवर सौंदर्याचा साज चढवून ते मराठीचे वैभव वाढवितात. उदा. - "पदाची कोर न सांडि" यातील "कोर" या शब्दात सामावलेला ध्वनी अर्थपूर्ण आहे.

८] कलात्मक प्रकर्षाच्या परोसीमेबरोबरच उपमारुपकांची आत्यंतिक आसक्ती, लयबध्दता, माधुर्याची तीव्र इच्छा, अनुप्रासाचे मोहक संगीत त्यांच्या साहित्यात प्रकर्षाने जाणवते.

थोडक्यात ज्ञानेश्वरांच्या चित्रवृत्ती निसर्गाच्या सौंदर्यात तल्लीन झालेल्या दिसतात. यातूनच निसर्गाच्या मोहक प्रतिमा त्यांच्या प्रतिने शोधलेल्या

दिसतात. निसर्गाचे केवळ वस्तुनिष्ठ वर्णन न करता निसर्गप्रतिमांत अंत:करणातील हळुवार भावनांचा सुगंध दरवळवण्याच्या वृत्तीमुळे त्यांना कुमुदिनीचे चंद्रावरील अलौकिक प्रेम जाणवले. पद्मिनी व सूर्याची मुग्ध प्रीती उमजली. कुमुदिनी व पद्मिनीची मानवी रूपे त्यांच्यासमोर उभी राहिली. वर्षाकालच्या लुसलुशीत तृणांकुरांच्या गालिच्यांनी आच्छादलेल्या गिरीतटाचे सौंदर्य, कोंभाची लवलव त्यांना जाणवली. वसंत ऋतूच्या येण्याने सौंदर्याची फुललेली खाण या साऱ्यांचेच वर्णन कुशल चित्रकाराला लाजविल या थाटात ते करतात. "अतिंद्रियपरी भोगवीन । इंद्रियाकरवी" असे म्हणणाऱ्या त्यांच्यासम प्रतिभासंपन्न कवीला अलौकिक गूढ निरवतेतील सौंदर्याची प्रतिमा देणे अशक्य नव्हते. या निसर्ग तदाकार वृत्तीमुळे त्यांना गुरुही पूर्ण चंद्र भासले. प्रज्ञावंत व प्रतिभाशाली कवी अध्यात्मक्षेत्रात इतका सहज संचार करू शकतो हे विचार करण्याजोगे आहे. म्हणूनच या प्रतिमांचा अभ्यास करताना रूक्ष तार्किकाची काटेकोर दृष्टी व रचनादोषामध्येच लक्ष केंद्रित करणाऱ्या पंडिताची भूमिका न स्वीकारता रसिक आस्वादकाची भूमिका स्वीकारली पाहिजे.

प्रतिमातून जाणवणारी ज्ञानेश्वरांची ही वैशिष्ठये पाहिल्यानंतर त्यांना असणाऱ्या पंचविधसंवेदनसृष्टीच्या आकर्षणावर देखील एक नजर टाकली. त्यांना असणाऱ्या रंगाच्या अनिवार आसक्तीचा परामर्श घेतला म्हणजे लाल, पिवळ्या, निळ्या, पांढऱ्या अशा विविध रंगांच्या स्वतंत्र छटांचे दर्शन आपणांस होते. स्वतंत्र रंगछटांबरोबरच एखाद्या कुशल चित्रकाराप्रमाणे विविध रंगांच्या मिश्रणाने होणारे रंगसौंदर्यही ते वर्णिताना दिसतात. कुंकमावर ठेवलेला शुभ्र स्फटिक, सोनेरी हिरव्या वेलीच्या पालवित विलसणारी लाल कळी, इंद्रधनूचे विविध रंग अशा रंगसंगतीही त्यांना आकर्षित करताना दिसतात. काही कविंच्या ठिकाणी रंगांची आसक्ती क्षीण असते तर काहींना निरनिराळ्या रंगातील विविध छटांचे तरल सौंदर्य प्रतित होतेच असे नाही. संवेदनशील कविच्या ठिकाणी रंगछटातील सौंदर्य प्रतीति प्रकटवण्याची लालसा अधिक दिसते. हीच अनिवार लालसा ज्ञानेशांच्या ठिकाणीही दिसते. याप्रमाणेच रस, रंग, स्पर्श व नाद यासंवेदनांचे प्रत्यंतरही येथे येते. यातून ही नितांत रमणीय कल्पनाचित्रे निर्माण करणारा कवी केवढ्या

"रोमँटीक" वृत्तीचा आहे याची जाणीव होते. कित्येकदा अनेकविध संवेदनांची एकच सांगड घालताना ते दिसतात.

ज्ञानेशांच्या प्रतिमासृष्टीचे रसावलोकन करुन म. वा. धोंडांनी यावर उहापोह केलेला दिसतो. "ज्ञानदेवांचा गीतानुभव म्हणजेच त्यांची प्रतिमासृष्टी" असे सांगून या प्रतिमांची ठळक वैशिष्ठये ते सांगतात. आपणांस हे निष्कर्ष पटतात.

अ] ज्ञानेश्वरीतील प्रतिमा अलंकरणरुप नसून प्रस्तुत आहेत - संस्कृत कथाकाव्यात नायकनायिका इ. वर्ण्यविषय शरीरी, मूर्त, पार्थिव असून त्यांना अमूर्त अलौकिक रुप देण्यासाठी उपमा दृष्टांतांचा वापर केलेला दिसतो. त्यात अतिशयोक्ती, चमत्कृती वा कल्पनाशक्तीचा प्रभाव दिसतो. याउलट गीतेतील वर्ण्य विषयच मुळी सात्त्वीक, राजस, तामस गुण, दैवी असूरी संपत्ती, मोक्ष, भक्ती या सारखे अमूर्त आहेत. त्यांचा अनुभव घेण्यासाठी ज्ञानदेव त्यांना उपमादृष्टांताधारे मूर्त रुप देतात. त्यामुळे ज्ञानेश्वरीत उपमादृष्टांत अप्रस्तुत न होता प्रस्तुतच होतात.

ब] ज्ञानेश्वरीतील प्रतिमांचे चेतन व कृतिशीलत्व - गीतेत विचार आहे तो गुण, लक्षण व तत्वाचा व ज्ञानेश्वरीत अनुभव आहे त्यांच्या अविष्कारांचा. हा अविष्कार स्वभावत:च चेतन व कृतिशील असल्याने ज्ञानेश्वरीतील प्रतिमाही तशाच बनतात. ज्ञानेश्वरीत अचेतन वस्तही सचेतन होऊन येतात. मातीचे घडे, गाडगे "कुल्लाल मतीचे गर्भ" होऊन उमटतात, नदीतला खडक नदीच्या पाण्यात पहुडलेला असतो, मीठ पाण्यात न विरघळता "जळे सीतळे लवण । अंगभूले ।।" ही अवस्था असते. ज्ञानदेव सृष्टीत सचेतन अचेतन भेद मानीत नाहीत.

क] गीतेतील अभावरुप संकल्पना ज्ञानेश्वरीतील प्रतिमात भावरुप होऊन येतात - गीतेत अदंभित्व, अद्रोह, अनहंकार, अभय, अहिंसा, निर्मम इ. अभावदर्शक नामे व विशेषणे आली आहेत. या अभावाचा प्रत्यक्ष अनुभव कसा घ्यावयाचा म्हणून ज्ञानदेव त्यांना भावरुप देतात. या भावरुपात मूळ पदाना विशाल अर्थ लाभून त्यातील अभावाची जाणीव हरपते.

उदा. अद्रोह म्हणजे स्वार्थापायी दुस-याचा घात न करणे. गीतेत हा गुण दैवी

संपत्ती ठरतो. अद्रोह म्हणजे दुर्गुणाचा अभाव. म्हणून ज्ञानदेव याला भावरूप देतात -

" फेडीली पापें ताप । पोसीति क्षितीचे पादप ।
समुद्रा जाय आप । गांगेय जैसें ।।
जगाचे आंध्य फेडितु । श्रियेचिं राउले उघडितु ।
निगे जैसा भास्वतु । प्रदक्षिणे ।।
तैसी बांधिली सोडिता । बुडाली काढिता ।
सांकडी फेडिता । आर्त्तांचिया ।।
किंबहुना दिवसें राती । पुढिलांचे चि सुख उन्नती ।
आणित आणिता स्वार्थी । प्रवेसिजे ।।
वांचौनि आपुलेया काजालागि । प्राणिज्ञाताचां हितभागीं ।
संकल्पाची ही आडवंगी । न करणें जें ।।" [ज्ञा.अ. १६-१९६ ते २०१]

गंगा व सूर्य यांच्या गतिमान व क्रियाशील प्रतिमा निर्माण करून ज्ञानदेवांनी अद्रोह या गुणाला विशाल, उन्नत व दैवी रूप दिले आहे.

ड] ज्ञानेश्वरीतील प्रतिमासृष्टी विश्वव्यापी आहे - ज्ञानेश्वरीतील प्रतिमांची व्याप्ती थक्क करून सोडणारी आहे. त्यात उंदीर, माकड, गाय, बैल, वासरू, सिंह, इ. पशू, पोपट, पारवा, बगळा, हंस, मोर, गिधाड, गरुड इ. पक्षी, मुंगी, भुंगा, काजवा, सरडा इ. कीटक, अशोक, आंबा, हिवर, सावर, खैर, चंदन, पिंपळ इ. वृक्ष, जाई, मोगरा, चाफा, शेवंती, पारिजात, कमळ इ. फुले, आवळा, निंबोणी, केळे, कवीठ, हरडा, द्राक्ष, आंबा इ. फळे, नदी, सरोवर, सागर, पर्वत, कडा, दरी इ. भौगोलिक आणि चंद्र, सूर्य, नक्षत्रे इ. आंतराळिक सृष्टी, विविध पेशांची व प्रवृत्तींची माणसे, इत्यादी, इत्यादी त्रैलोक्यातील चराचर आले आहे.

ज्ञानदेवांची प्रतिभा एकाच झेपेत जल, स्थल व अवकाश या तिन्ही लोकांत लीलया संचार करते.

उदा. "काइ चंचलु मासा । कामिनीकटाक्षु काइसा ।
वलला क्षेत्रे तैसा । बीजु नाहिं ।।" [ज्ञा.अ. १४-१६९]

मासा हा प्राणी, कामिनी मानव आणि वीज दैवी । माशाचा संचार जलात, कामिनीचा पृथ्वीवर आणि विजेचा आकाशात । ज्ञानदेवांच्या प्रतिभेने साडेतीन चरणांत हेच तिन्ही लोक संक्रांत केले, पण एकही चरण न लांबवता, अवघ्या दहा शब्दांत ।

प्रतिमा या स्वभावतःच ऐंद्रिय असल्यामुळे त्यांचे ग्रहण प्रथम इंद्रियांनीच केले जाणार, पण ते तसे करायचे ते ज्ञानेश्वरीतील अतींद्रिय असा अध्यात्मिक आशय अनुभवण्याकरिता. "अतींद्रिय परि भोगवीन । इंद्रियांकरवी ।।" [ज्ञा.अ. ६-३६] अशी ज्ञानदेव प्रतिज्ञा करतात ती याच दृष्टीने. परंतु ज्ञानदेवांची प्रतिमासृष्टीच एवढी विशाल, वैचित्र्यपूर्ण व मोहक आहे की श्रोते तिच्या उपभोगातच रंगून जाण्याचा दांडगा संभव आहे. तसे झाले तर स्वाभाविकपणेच ज्ञानेश्वरीच्या अध्यात्मिक आशयाला ते मुकणार. ज्ञानदेवांना या धोक्याची पुरेपूर जाणीव आहे. म्हणूनच या प्रतिमा इंद्रियानी भोगून झाल्यावर त्या "इंद्रिया देऊनि कवाड । हृदयीं भोगीं ।।" [ ।.अ. ९-१३४] अशी सूचना ते करतात. "हृदयी भोगणें" म्हणजे या प्रतिमांचे चिंतन करीत त्यातील आशय अंतःकरणात मुरवणे. हे केले नाही, तर अध्यात्मिक आशय निसटून मनात केवळ प्रतिमाच रेंगाळत राहतील.

ज्ञानदेवांची प्रतिमासृष्टी विश्वव्यापी आहे. तिने पर्वतापासून खडकांपर्यंत, समुद्रापासून डबक्यापर्यंत, सूर्यापासून काजव्यापर्यंत, राजहंसापासून माशीपर्यंत, हत्तीपासून मुंगीपर्यंत, अश्वत्थापासून कवळ्या कोंबापर्यंत, सज्जनापासून दुरितांपर्यंत, सर्व चराचर सृष्टी व्यापली आहे. ही प्रतिमासृष्टी विश्वातील चराचराशी आपले नाते जोडते आणि आपल्या प्रत्ययाला असे आणून देते की अत्यंत क्षुद्र प्रेरणेने चलबिचल होणारे तृणबिज, तसाच अखंड जलप्रवाहात वास्तव्य करूनही अंतर्यामी अलिप्त राहणारा खडक, विषयोपभोगाच्या "शेंबुडीं गुंतला मशक", तसाच पहिल्या पावसाने सर्वांगावर तृणांकुरांचे रोमांच धारण करणारा शैल, झाडाच्या बुडख्यापासून शेंड्यापर्यंत आणि

शेंडयापासून बुडख्यापर्यंत धावणारा मातलेला सरडा, तसाच "जगाचे आंध्य फेडितु । क्रियेचिं राउळे उघडितु ।" प्रतिदिन प्रदक्षिणा घालणारा भास्वत सूर्य ही आपलीच रूपे आहेत. प्रतिमा- प्रतिमांतून अशी आपली स्वार्थी- उदार, क्षुद्र- उदात्त, लोभी - उदास रूपे न्याहाळता न्याहाळता श्रोता नकळतच विश्वरूप होतो, विश्वात्मक होतो.

ज्ञानदेवांच्या तत्वविचारांप्रमाणेच त्यांची प्रतिमासृष्टीही चैतन्य निर्झर, क्रीयाशील, भावरूप, व विश्वव्यापी झाल्यानेच श्रोते ज्ञानेश्वरीतील अध्यात्म अनुभवू शकतात.

ज्ञानेश्वरीतील निसर्गाच्या आलंबन, उद्दीपन वगैरे रूपांचाही विचार केला असता एका महत्वाच्या मुद्दयावर आपले लक्ष केंद्रित करावे लागते. अर्थात हा मुद्दा सर्वांनाच पटेल असा नाही. ज्ञानेशांची पंचसंवेदनात्मक सृष्टी पाहिल्यानंतर याच्याशी साम्य साधणारा आणखी एक कवी आपल्या नजरेसमोर उभा राहतो तो म्हणजे बालकवी. बालकविंनीदेखील निसर्गाचाच एक स्वतंत्र अध्याय आपल्या कवितेत मांडला आहे. निसर्गातल्या तेज, रूप, रस, गंध, रंग यांच्या विविध छटा आपल्या काव्यातून मांडल्या आहेत. "सांज खुले सोन्याहुन पिवळें हें पडलें ऊन" यातील सोन्याहून पिवळ्या रंगाचा, "स्वर्गाचे नव लेख कुंकुमरसे ती सांध्यदेवी लिही" यातील तांबूस रंगाची तर "वरुनि कुणि गुलजार फिरविला हात कुसुंब्याचा" यातील संध्याकाळच्या तांबूस रंगाचे वर्णन ज्ञानेश्वरीतील "कुंकुमाचे भरीव । सिध्द रसाचे वोतीव", "एकें अरुणोदयासारिखी । कुंकुमवर्णे ।" येथील लाल रंगाचा असे रंगोल्लेख बालकवींशी साम्यच दाखवितात.

"हिरवे हिरवे गाल गालिचे । हरित तृणाच्या मखमालीचे" यातील दृश्य व स्पर्श संवेदना "कां भूमीयें मार्दव । सांगे कोंभाची लवलव । " या संवेदनेशी सादृश्य सांगतात. दोघेही निसर्गकवीच. पण बाण, कालिदास, स्पेन्सर, कीटस् यांच्याप्रमाणेच तत्वबोधाची प्राप्ती काव्याद्वारे करून देण्याचे ध्येय पत्करलेल्या

ज्ञानेश्वरांच्या ठायी "रोमँटीक" कवीला साजेल अशी रंगांची अनिवार आसक्ती दिसली तरी ते अध्यात्माच्या बंधनांनी जखडलेले दिसतात. बालकवी निसर्गाची विस्तृत वर्णने स्वतंत्रपणे करु शकले कारण त्यांच्यावर कुठल्या तत्वनिष्ठेचे, अध्यात्म प्रतिपादनाचे बंधन नव्हते. पण ज्ञानेश मात्र या पंचसंवेदनांचा अविष्कार घडवूनही विशिष्ठ मर्यादेमुळे निसर्गाचा स्वतंत्र व मुक्त अविष्कार घडवू शकले नाहीत. याचा अर्थ त्याना ते घडवता आले नसते असा नव्हे. बालकवी हे पूर्ण लौकिकातच वावरत होते. त्यातून जाणवणारे गूढाभास त्यांनी चित्रित केले तरी पारलौकिकाच्या ज्ञानेश्वरनिर्मित पायरीपर्यंत ते पोहोचलेले नाहीत. एखाद्या सामान्य स्त्रीला साडीचा पोत, रंग, नक्षी आवडावी तसा बालकवींना निसर्ग आवडला होता. पण त्याच वस्त्रात सुखदु:खाचे उभे आडवे धागे एखाद्यास जाणवावेत तसा लौकिकातला पारलौकिकपणा ज्ञानेशांना जाणवला होता. त्यामुळे बालकवी निसर्गकवी ठरले व ज्ञानेश्वर निसर्गकवी न ठरता अध्यात्मकवी ठरले. ज्ञानेश्वरीतला फक्त निसर्ग मध्यात्मापासून वेगळा करून पाहिला तर मात्र मराठीतला पहिला श्रेष्ठ निसर्गकवी म्हणून ज्ञानेशांचेच नांव घ्यावे लागेल.

सर्व प्रकरणांच्या निष्कर्षांनी आपणास एवढेच म्हणावे लागेल की सूर्यप्रकाश, चंद्रप्रकाश, तारकासौंदर्य, कमलिनी, कुमुदिनी, चंद्रकिरणस्त्रावक चंद्रकांत, पौर्णिमेला येणारी सागरभरती, शरदातील चंद्र, वसंतागमन, कमलागंध, गाणे संपल्यावर उरणारी मोहक लकेर ह्या ज्ञानेशांच्या विशेष आवडत्या प्रतिमा दिसतात. या सा-या त्यांच्या जातिवंत रसिकतेतूनच निर्माण झाल्या आहेत. पाऊणशेवेळा चंद्राचे, सव्वाशे ठिकाणी सूर्याचे, पंधरा ठिकाणी वसंताचे, आठदहा ठिकाणी चंद्रकांताचे, वीस ठिकाणी कमळाचे उल्लेख आले आहेत. शिवाय फुलांच्या निरनिराळ्या रंगाचे उल्लेख असंख्य ठिकाणी दिसतात. "कवित्वी बरवें रसिकत्व" या उक्तिची सार्थकता येथे पटते.

कोणालाही साध्या वा गहन तात्त्विक प्रतिपादनासाठी ज्ञानेश्वर रसिकतेने रसरसलेली प्रतिमाच निवडतात. विवेचन अध्यात्माचे करावयाचे नि

स्वैरात मात्र मोहक प्रतिमांचीच करायची ही "खानदानी रसिकता" त्यांच्यात दिसते. सृष्टीतल्या रसरशीत सौंदर्याकडे ते चटकन आकर्षित होतात. "जैसा कां हिरवे चारी । भांबावे पशु ।" अशी त्यांची निसर्ग सान्निध्यात अवस्था होते. त्यांच्या प्रतिमांवर रसिकतेचे विलक्षण वर्चस्व दिसतेच. यामुळेच कित्येकदा त्यांची रसिकता निसर्गसौंदर्याचा उंबरठा ओलांडून शृंगाराच्या प्रांतातही घुटमळू लागते.

थोडक्यात एवढेच म्हणता येईल की अतींद्रिय वस्तु ऐंद्रिय प्रतिमांच्या कोंदणात जडवून प्रमेबरोबर वस्तूचेही दर्शन घडविण्याची अद्भुत किमया ज्ञानदेवांना साधली आहे. "विश्व ब्रम्हचि केले" या तीनच शब्दात रामजनार्दनींनी ज्ञानेश्वरीचा जो अनन्य विशेष सांगितला आहे त्याचा प्रत्यय या प्रतिमातून निश्चितच येतो.

## - संदर्भ ग्रंथ सूची -


१] अदवंत म. ना. व खांडेकर [संपा. ] - ज्ञानेश्वरी अ. १२ - अनमोल प्रकाशन, पुणे - च. आ. १९८८

२] अदवंत म. ना. व खांडेकर [संपा. ] - ज्ञानेश्वरी अ. ९ - अनमोल प्रकाशन, पुणे - प्र. आ. १९७५

३] अदवंत म. ना. व खांडेकर [संपा. ] - ज्ञानेश्वरी अ. १६ - अनमोल प्रकाशन, पुणे - प्र. आ. १९६९

४] बनहट्टी श्री. ना. [संपा. ] - ज्ञानेश्वरी अ. १

५] भावे, दाते [संपा. ] - ज्ञानेश्वरी अ. १२ - मेहता प्रकाशन, कोल्हापूर

६] भोसले द. ता. [संपा. ] - ज्ञानेश्वरी अ. १

७] दादेगावकर प. रा. - "ज्ञानेश्वरांची रससमिक्षा - हैद्राबाद विदयापीठ

८] धर्माधिकारी पु. दि. - वाङ्‌मयसिध्दांत - अजब पुस्तकालय, कोल्हापूर - १९७८

९] दांडेकर [संपा. ] - सार्थ श्रीज्ञानेश्वरी

१०] दांडेकर शं. वा. [संपा. ] - ज्ञानेश्वरी अ. १२ - व्हीनस प्रकाशन, पुणे - च. आ. १९८९

११] देसाई लिमये [संपा. ] - ज्ञानेश्वरी अ. १२ - फडके पकाशन, कोल्हापूर

१२] देसाई लिमये [संपा. ] - ज्ञानेश्वरी अ. १ - फडके प्रकाशन, कोल्हापूर

१३] धोंड म. वा. - "ज्ञानेश्वरीतील लौकिक सृष्टी" - मौज प्रकाशन, मुंबई प्र. आ. १९९१

१४] दोशी, गोखले [संपा. ] - ज्ञानेश्वरी अ. १ - मेहता प्रकाशन, पुणे

१५] एरंडे अशोक [संपा. ] - "ज्ञानेश्वर सप्तशताब्दी ग्रंथ" - ज्ञानेश्वर विदयालय नेवासे., प्र. आ. १९९१

१६] इर्लेकर सुहासिनी [संपा.] - "ज्ञानेश्वरीचे अंतरंग" -म. सा. प. औरंगाबाद - प्र. आ. १९९१

१७] गाडगीळ गंगाधर - "खडक आणि पाणी" - उत्कर्ष प्रकाशन - १९८५

१८] गुणे मो. रा. - ज्ञानेश्वरीचे भावविश्व

१९] गुप्ता किरणकुमारी - "हिंदी काव्यमें प्रकृतिचित्रण"

२०] भिडे बा. पु. व खांडेकर सुर्यकांत [संपा.] - ज्ञानेश्वरी अ. र. - अजब पुस्तकालय, कोल्हापूर, प्र. आ. १९६८

२१] घैसास दिवाकर - पसायदान निरूपण - बळवंत प्रकाशन, पुणे - द्वि. आ. १९८९

२२] हुपरीकर ग. श्री. - तत्वज्ञ कवी श्रीज्ञानेश्वरी - श्रीज्ञानेश्वर दर्शन भाग १.

२३] जोग रा. श्री. -मराठी वाङ्मयाभिरूचीचे विहंगमावलोकन - पुणे विद्यापीठ, प्रकाशन प्र. आ. १९५९

२४] जोग रा. श्री. - केशवसुत - पुणे विदयापीठ प्रकाशन

२५] जोशी प्र. न. - ज्ञानेश्वरांचे जीवनदर्शन - प्रसाद प्रकाशन, पुणे - प्र. आ. १९७२

२६] जोशी प्र. न. - मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास - प्रसाद प्रकाशन, पुणे - द्वि. आ. १९७८

२७] खांडेकर भालचंद्र व गोविलकर लीला [संपा.] - ज्ञानेश्वरी अ. १ - अनमोल प्रकाशन, पुणे - प्र. आ. १९७९

२८] केळकर द. के. - काव्यालोचन

२९] केतकर श्री. व्यं - महाराष्ट्रीय ज्ञानकोश - वेदविदया भाग २

३०] कुलकर्णी - "ज्ञानेश्वरी" विठ्ठलपंत - सार्थ अमृतानुभव

३१] कुलकर्णी गो. म. - नवसमीक्षा काही विचारप्रवाह - मेहता प्रकाशन, पुणे

३२] कुलकर्णी गो. म. – रसग्रहण मला व स्वरुप – कॉन्टि. प्रकाशन, पुणे १९७३

३३] कुलकर्णी गो. म. – ज्ञानेश्वरांची साहित्य दृष्टी व सृष्टी – मेहता प्रकाशन, पुणे – प्र. आ. १९९२

३४] कुलकर्णी एस. ए. – ज्ञानामृत चैतन्य प्रकाशन कोल्हापूर – प्र. आ. १९९२

३५] लेले वा. के. – ज्ञानेश्वरीचा शास्त्रीय अभ्यास – साहित्य प्रसार केंद्र, नागरपूर – प्र. आ. १९८६

३६] मर्ढेकर बा. सी. – "सौंदर्य आणि साहित्य" – मौज प्रकाशन, मुंबई १९८७

३७] मालसे स. गं. [अनु. ] – साहित्य सिध्दांत – महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई – प्र. आ. १९८२

३८] मंचरकर र. बा. – [संपा. ] – ज्ञानेश्वरी अ. १ – युनिव्हर्सल पब्लीकेशन, कोल्हापूर, प्र. आ. १९७५

३९] मंचरकर र. बा. [संपा. ] – ज्ञानेश्वरी अ. ७ – युनिव्हर्सल पब्लीकेशन, कोल्हापूर – प्र. आ. १९७३

४०] मंगळूरकर व केळकर [संपा. ] – ज्ञानेश्वरी अ. ३ – पॉप्यु. प्रकाशन, मुंबई १९६३

४१] मंगळूरकर व केळकर [संपा. ] – ज्ञानेश्वरी अ. ५ – पॉप्यु. प्रकाशन, मुंबई १९६३

४२] मंगळूरकर व केळकर [संपा. ] – ज्ञानेश्वरी अ. ९ – पॉप्यु. प्रकाशन, मुंबई १९६७

४३] मंगळूरकर व केळकर [संपा. ] – ज्ञानेश्वरी अ. १२ – पॉप्यु. प्रकाशन मुंबई १९६१

४४] पांगारकर ल. रा. – मराठी वाङमयाचा इतिहास – खंड १ – विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे – द्वि. आ. १९७२

४५] पाध्ये प्रभाकर - सौंदर्यानुभव " मौज प्रकाशन, मुंबई १९७९

४६] पाटील मालती - तुकारामांची प्रतिमा सृष्टी व त्यांच्या काव्यात्म-
शक्तीचे मूल्यमापन - नागपूर विद्यापीठ प्रकाशन, १९७८

४७] पवार गो. म. व हातकणंगलेकर [संपा. ] - मराठी साहित्य प्रेरणा व
स्वरूप - पॉप्युलर प्रकाशन, मुंबई -१९८६

४८] पंगु द. श्री. [संपा. ] - ज्ञाने. अ. १५ - स्कूल, कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर

४९] रसाळ सुधीर कविता व प्रतिमा - मौज प्रकाशन, मुंबई १९८२

५०] सहस्त्रबुध्दे अनिल - ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार - दास्ताने, रामचंद्र
आणि कं. - प्र. आ. १९९१

५१] साखरे किसन महाराज - सार्थ श्रीज्ञानेश्वरी - यशोधन प्रकाशन पुणे,
स. आ. - १९८५

५२] साखरे नानामहाराज - सार्थ श्रीज्ञानेश्वरी - सारथी प्रकाशन पुणे -
संपा. दत्तराज देशपांडे

५३] साखरे नानामहाराज - सार्थ श्रीज्ञानेश्वरी - पका. आपटे त्र्यंबक हरी -
पुणे - च. आ. १९२४

५४] सोहोनी भालचंद्र [संपा. ] - ज्ञानेश्वरी अ. ४ - प्रसाद प्रकाशन, नागपूर

५५] शेटे वि. त्र्यं. - संत ज्ञानदेव चरित्र, कार्य व तत्वज्ञान - श्रीज्ञानेश्वर
विद्यापीठ प्रकाशन, आळंदी - प्र. आ. १९७६

५६] शेणोलीकर ह. श्री. - मराठी संतवाणीचे मंत्राक्षरत्व - मॅजेस्टिक प्रकाशन,
मुंबई - प्र. आ, १९९०

५७] स्वामी शिवतत्वानंद - श्री ज्ञानेश्वर तत्वदर्शी आणि कवी - रामकृष्ण
मठ, नागरपूर - च. आ. १९८६

५८] तुळपुळे शं. गो. - पाच संतकवी - सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, तृ. आ. १९८४

५९] तावरे स्नेहल - ज्ञानेश्वरीतील सृष्टी - ज्ञानेश्वरी आणि निसर्ग

६०] उनउने, कुलकर्णी, आडावकर, मंचरकर [संपा. ] - ज्ञानेअ. २ - साहित्य सेवा प्रकाशन, सातारा - प्र.आ. १९६८

६१] वाळिंबे रा. शं - ज्ञानेश्वरीतील विदग्ध रसवृत्ती

६२] अनुभवी प्राध्यापक [संपा. ] - ज्ञाने. अ. ९- मोघे प्रकाशन, कोल्हापूर

६३] अनुभवी प्राध्यापक [संपा. ] - ज्ञाने. अ. १६ - मोघे प्रकाशन, कोल्हापूर

## वृत्तपत्रे, मासिके व प्रबंध

१] "केसरी" ज्ञानेश्वरी सप्तशताब्दी विशेषांक - जून १९९०

२] महाराष्ट्र जीवन भाग २ - तत्वमीमांसा आंग्लपूर्व १९६०

३] अभिनव - वार्षिक नियतकालिक, कन्या महाविद्यालय मिरज, १९९२

४] ज्ञानदूत - दिवाळी १९८९

५] जीवनविकास -१९८८ - सहामाही अंक - रामकृष्ण मठ, नागपूर

६] अभिजात निसर्ग - दिवाळी १९९०

७] प्रसाद - जाने १९८८ ते जाने १९८९ - प्रसाद प्रकाशन

कुलकर्णी वि. ना. [सांगली] - मराठी साहित्यातील निसर्ग [प्रबंध]